REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 6 | MARCH - 2022

# भाषा : स्वरूप व कार्य



डॉ. प्रतीक्षा गायकवाड
मराठी विभाग प्रमुख, पेमराज सारडा महाविद्यालय,
अहमदनगर.

## प्रास्ताविक :

भाषा हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये भाषेचे अस्तित्व जाणवते. भाषेच्याद्वारे आपण जीवनातील व्यवहारसुध्दा करतो उदा. रागावणे, प्रेम करणे, शिव्या देणे, निर्देशन करणे, वर्णन करणे, आज्ञा देणे, खोटे बोलणे, कविता लिहिणे, इतकेच नाही तर तो विचारसुध्दा भाषेतूनच घडत असतो आणि स्वप्न सुध्दा भाषेतूनच पाहत असतो. ज्याला भाषाच येत नाही असा मानवसमुह पृथ्वीवर उपलब्ध नाही. इतर प्राणिमात्रांच्या तुलनेने मानवाने स्वत:ची प्रगती करुन घेतली आहे. तिच्या मुळाशी त्याची भाषा आहे. भाषेमुळेच माणसाला समाजात राहणे, सामाजिकसंस्था निर्माण करणे आणि संस्कृतीचा विकास करणे शक्य झाले आहे.

## भाषेच्या व्याख्या :

भाषेचे स्वरूप समजावून घ्यावयाचे असेल तर भाषेच्या व्याख्या पाहणे आवश्यक आहे.

## कोशगत अर्थ :

1. ‘ भाषा म्हणजे बोलणे‘ एवढाच स्थूलमानाने अर्थ आपणास माहित असतो.
2. ‘भाषा म्हणजे वाणीचे व्यक्त रुप‘ही कल्पना पूर्वापार चालत आलेली आहे.
3. ‘भाषा‘हाशब्द ‘भाष्‘ या नामदर्शक आणि क्रियादर्शक शब्दांपासून आलेला आहे. त्याचा मूळ अर्थ बोलणे,आवाज उत्पन्न करणे असा आहे.
4. इंग्रजीशब्दकोशात‘भाषा‘ या शब्दासाठी‘ Language‘,‘Speech‘,‘Tongue‘ असे पर्याय सूचविलेले दिसतात. ‘Language‘ या शब्दाचे मूळ लॅटिन शब्द ‘Lingua‘हे आहे. ‘Lingua‘ म्हणजे ‘Speech‘. कोशवाङ्मयात ‘भाषा‘या शब्दाचा‘मानवी मुखातून निघालेली सार्थ ध्वनिसंहिता‘ असा अर्थ दिलेला दिसतो.
5. भाषा म्हणजे मनातले विचाार व्यक्त करण्याचे साधन (बोली)
   (अभिनव मराठी शब्दकोश भाग 4था ते संपा द.ह.अग्निहोत्री,व्हीनस प्रकाशन, पुणे )
6. ‘ वर्णनात्मक भाषाविज्ञान‘ या ग्रंथात डॉ. लीलागोविलकर म्हणतात, भाषेच्या संकल्पनेमध्ये अर्थातच‘ भाषिक व्यवस्था‘ आणि‘ भाषिक व्यवहार‘ या दोन्हीचा अंतर्भाव ही भाषिक व्यवस्था किंवा भाषाव प्रत्यक्ष एखादया व्यक्तिच्या बोलण्यातील भाषा - वाक्ये, शब्दोच्चार, शब्दसंग्रह इ. मध्ये असतो. प्रत्येक व्यक्तीच्या बोलण्यात तिच्या व्यक्तिगत लकबी आवडीनिवडी, व्यक्तहोत असतात आणि अशा अनेक व्यक्तीच्या बोलण्यातून भाषा घडत असते प्रत्येकाचे बोलणे म्हणजेच भाषण हे त्या भाषच्या वैशिष्ट्यांशी निगडित असले तरी त्यामध्ये व्यक्तिपरत्वे भिन्नताही असते एखाद्या व्यक्तीचे बोलणे हे प्रत्यक्ष असतेव भाषा ही अप्रत्यक्ष व अगोचर असते. भाषा व भाषण यांमध्ये फरक असतो तो यामुळेच (भाषण म्हणजे व्यक्तीचे प्रत्यक्ष बालणे) थोडक्यात भाषण हे व्यक्तिशी निगडित असलेतर भाषा ही समाजाशी, त्या व्यक्तिसमूहाशी निगडीत असते.

### संपर्क व्यवहार किंवासंदेशनकिंवाविज्ञापन किंवा Communication :

भाषेच्या माध्यमातून माणसे ऐकमेकांशी संपर्क साधतात म्हणजेच माहिती, ज्ञान, विचार, अनुभव, भावना यांची देवाण-घेवाण करतात. एकमेकांना समजून घेतात. एकमेकांशी संबंध नाती प्रस्थापित करतात. या देवाण-घेवाणीच्या प्रकियेला विज्ञापन किंवासंदेशन / Communication म्हणता येईल. तेव्हा भाषेचे मूलभूत कार्य म्हणजे सामाजिक संदेशन होय.

### भाषा - एकसंकेत - प्रणाली :

'भाषा' हाशब्दप्रयोग आपण अनेक अर्थांनी वापरतो. हावभावांची भाषा, प्राण्यांची भाषा, स्काऊटमधील ध्वजांची, रस्त्यावरील वाहतुकीच्या दिव्यांची भाषा, संगणकाची भाषा सर्वठिकाणी भाषा हा शब्दप्रयोग नेहमीच्या अर्थानेच वापरता येतो.'संकेताची पध्दत'किंवा'संकेतप्रणाली' या अर्थाने वापरला जातो / वापरलेला असतो, भाषा ही देखील एकसंकेत प्रणालीच आहे. ध्वनी हे भाषेचे माध्यम आहे. म्हणजे भाषेची संकेतव्यवस्था ध्वनीसंकेतावर आधारीत असते. इतर संकेतप्रणालीच्या तुलनेत भाषाही अधिक सुटसुटीत, लवचिक, वैशिष्टयुक्त, उपयुक्त आणि केव्हा ही सहज वापरता येणारी संकेत प्रणाली आहे. भाषेचे माध्यम असलेला ध्वनी अनेक गुणवैशिष्टयांनी युक्त आहे. ध्वनीच्या गुणकारकतेमुळे भाषाही सर्वाधिक उपयुक्त संकेत व्यवस्था झाली आहे.

### प्राण्यांची भाषा आणि माणसांची भाषा :

काही प्राणी मुखावाटे ध्वनी निर्माण करतात व त्या ध्वनिसंकेताच्या आधारे दुस-या स्वजातीय प्राण्यांपर्यंत संदेश पोहोचवितात. यालाच आपण 'प्राण्यांची भाषा' असे म्हणतो परंतु प्राण्यांच्या भाषेची संकेतप्रणाली फारच सरधोपट असते. ती मानवी भाषेच्या संकेतप्रणाली इतकी गुंतागुंतीची असते. ती एकेरी आणि मर्यादित असते. काही ठराविक, विशिष्ट आशय सुचविण्यापलीकडे प्राण्यांच्या भाषेची संकेतप्रणाली प्रगत झालेली नसते.

प्राण्यांना भाषा जन्मजात अवगत असते. पण मानवाला भाषा जन्म जात मिळत नाही. मानवी मेंदूमध्ये भाषाग्रहण करण्याचे सामर्थ्य असते. या 'भाषिक क्षमते' मुळे मानवी मुल कानावर पडलेली भाषा शिकू शकते. उदा. लांडग्यांच्या कळपात वाढलेल्या मानवी मुलाला कोणतीच मानवी भाषा येत नाही किंवा आफ्रिकन मूल इंग्लिश परिवारात वाढलं, तर इंग्रजी बोल लागते. प्राण्यांच्या मेंदूमध्ये भाषा ग्रहण शक्ती नसते. माकडे माणसांच्या सहवासात राहिली तरी मानवी भाषा बोल शकत नाही. प्राण्यांच्या भाषेत ध्वनिघटक सुटेसुटेपणाने वापरले जातात. ध्वनिघटकांना स्वत:चा अर्थ असतो. म्हणजे प्राणी जेवढे ध्वनिघटक वापरतात, तेवढेच अर्थ त्यांच्या भाषेत असतात. हे अर्थही फारसे व्यामिश्र वगुंतागुतीचे नसूनशारिरगरजा भागविणा-या क्रियांचा निर्देश करणार असतात. मानवी भाषेत ध्वनिघटक कधीही सुटेसुटे वापरले जात नाहीत. त्यांची विशिष्ट क्रमाने केलेलीरचना (सानुक्रम रचना ) वापरली जाते. प्राण्यांच्या भाषेप्रमाणे मानवी भाषेत सुध्दा ध्वनिघटकांना अर्थ नसतो. ध्वनीच्या सानुक्रम रचनांना अर्थ असतो. ध्वनिसमुच्चय आणि अर्थ यांच्यामध्ये कोणताही कार्यकारण संबंध नसतो.

### ध्वनि - अर्थ - संकेत

मानवी भाषेत सुमारे 30 ते 70 टक्के ध्वनिघटक म्हणजेच मूलध्वनी किंवा स्वनिम वेगवेगळया रचना करुन वापरले जातात. मराठीतील 'खडू' या रचनेचे उदाहरण घेतले असता, या रचनेतील'ख','अ','ड','ऊ' या चारही ध्वनींनास्वत:चा असा कोणताच अर्थ नाही. पण मराठी बोलणा-यांनी मात्र 'खडू' या ध्वनिसमुच्चयाचा 'फळयांवर लिहिता येणारा विशिष्ट पदार्थ' असा अर्थ यांच्यामध्ये अशाप्रकारे कार्यकारण संबंध नसल्यामुळे एकाच आशयासाठी वेगवेगळया भाषेत शब्द आढळतात. जसे खडूला इंग्रजीमध्ये चॉक म्हणतात. एकाच भाषेत एका आशयासाठी दोन किंवा अधिक शब्द यामुळे आढळतात. ध्वनिसमुच्चय आणि आशय यांचा संबंध पुर्णपणे यादृच्छिवु म्हणजे योगायोगाने जुळलेला असतो. मात्र ही भाषा बोलणा-यांना तो संबंध मान्य असतो. कोणत्या शब्दाने कोणत्या आशयाचा बोध करुनघ्यायचाहे संकेतामध्ये ठरलेले असते. तो संकेत ती भाषा बोलणा-या समाजातील सर्वांना मान्य असतोव माहितीही असतो. याचाच अर्थ असा की, संकेतांना सामाजिक मान्यता असावी लागते. (ते सहजप्रेरणेने निर्माण झालेले नसतात. म्हणून सहज प्रेरणेने स्वीकारताही येत नाहीत.) आपण भाषा शिकतो म्हणजे ती भाषा बोलणा-या समाजाने मान्य केलेली त्या विशिष्ट भाषेची संकेतप्रणाली शिकत असतो. उदा. मराठी भाषेत पुस्तक, दिवा, सरडा, बाग, इ. सारख्या अनुक्रम ध्वनिरचनांना संकेतामुळे अर्थ प्राप्त होतो. परंतु कुस्तप, डारस, गबा या सारख्या सानुक्रम रचना मराठी भाषेतील मूलध्वनींनी बनलेल्या असनूही त्यांना संकेताने कुठलेही अर्थ प्राप्त झालेले नाहीत.

बोलणा-यांने मुखावाटे उच्चारलेले ध्वनी हा भाषेचा आरंभबिंदू, तर ऐकणा-याने ग्रहण केलेला अर्थहा भाषेचा अखेरचा टप्पा होय. बोलणारा आपल्या मनातील आशयाने ध्वनिरचनांमध्ये संकेतीकरण करतो. ऐकणारा प्रथम ध्वनी ग्रहण करतो आणि ध्वनिरुप रचनांचे विसंकेतीकरण करुन बोलण्यातील अर्थ समजावून घेतोही प्रक्रिया पुढीलप्रमाणे दाखवता येईल.

**बोलणारा (संकेतीकरण)**

| | | |
|---|---|---|
| | आशयाचे | संकेतीकरणानुसार |
| आशय | संकेतीकरण, | प्रत्यक्ष ध्वनिनिर्मिती |

**ऐकणारा ( विसंकेतीकरण)**

| | | |
|---|---|---|
| ध्वनींची | ध्वनिरुप | आशय |
| स्वीकृती | संकेत उलगडण्याची | प्रक्रिया |

बोलणारा आणि ऐकणारा या दोघांनाही भाषेतील अर्धसंकेत माहिती असल्याखेरीज भाषिक विनिमय होऊ शकत नाही. कानडी समजत नाही असे जेव्हा मराठी माणूस म्हणतो तेव्हा त्याच्या कानापर्यंत कानडीतील ध्वनिरचनाच फक्त पोहोचत असतात, त्या रचनांमागील अर्थसंकेत त्याला माहित नसल्यामुळे अर्थबोध होऊ शकत नाही.

## भाषेची लक्षणे :

भाषा हे माणसाच्या हाती आलेले असेच महत्वाचे साधन आहे. त्यामुळे ‘भाषा वापरणारा प्राणी‘अशी माणसाची एक व्याख्या केली जाते. इतर प्राण्यांच्या संदेशप्रणालींच्या तुलनेत मानवी भाषेत जे वेगळेपण जाणवते. तिच्यातील लक्षणांमुळेच. हॉकेट या भाषा वैज्ञानिकाने भाषेची पुढील सात प्रमुख लक्षणे सांगितलेली आहेत.

### 1. द्विस्तरीय रचना (Duality of Patterning ) :

भाषेची रचना द्विस्तीय असल्याने मर्यादित मूलध्वनींच्या साहाय्याने अगणित आशय सहजपणे व्यक्त करता येतात. भाषांतील मुलध्वनींची संख्या कमीत कमी 30 आणि जास्तीत जास्त 70 च्या आसपास असते. मूलध्वनींना स्वत:चे अर्थ नसतात. परंतु त्यांची हवी तशी सानुक्रम रचना करता येते. त्यामुळे अत्यल्प अशा मूलध्वनींच्या साहाय्याने शब्दांत सांगायचे तर ध्वनींचे संयोग, स्थान परिवर्तन, आवृतीच्या साहाय्याने मर्यादित ध्वनिसमूहांपासून असंख्य सार्थ ध्वनिगट तयार करता येतात, भाषाविज्ञानाच्या परिभाषेत यालाच ‘ रुपिम‘ असे म्हणतात. मूलध्वनीच्या वेगवेगळया प्रकारे रचना कशी करता येते याचे उदाहरण पुढीलप्रमाणे पाहता येईल.

मराठीतील ‘‘आ‘‘ ‘‘क‘‘ आणि ‘‘न‘‘ हे तीन मूलध्वनी होऊन अनुक्रमे क + आ+ न = कान , न+आ+क = नाक, क+आ+न+आ= काना, न+आ+क+आ = नाका अशाचार वेगवेगळया सार्थरचना तयार करता येतात.

1. मूलध्वनींचा मर्यादित साठाहा भाषेचा एकस्तर
2. आणि मूलध्वनीच्या वेगवेगळया रचना करुन निर्माण केलेले अगणित अर्थहा भाषेचा दुसरास्तर. प्राण्यांच्या भाषेची रचना अशी द्विस्तरीय असते. त्यांच्या भाषेत एका संकेतासाठी एक मूलध्वनी अशी पध्दत असते. द्विस्तरीय रचनेमुळे थोडया सामग्रीच्या आधारे अगणित आशय सूचित करता येत असल्याने काटकसरीचे तत्व पाळले जाते.

### 2. निर्मितीशीलता ( Productivity ):

पूर्वी कधीही ऐकले नाही किंवा स्वत: उच्चारले नाही असे नवे वाक्य, नवीरचना किंवा नवा भाषिक प्रयोग आपण करु शकतो. आपण जेहे पुर्णपणे नवीन असे उच्चारणसादर करीत असतो. ते ऐकणा-यालाही खास प्रयत्न करावे न लागता समजते याचे कारण म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यात भाषेची एक नियमव्यवस्था सिध्द झालेली असते. ही नियम व्यवस्था निर्मितशील असते म्हणजेच तिच्यातून अनंत प्रकारची वाक्ये बनवता येतात.

या निर्मितीशीलतेच्याच जोडीला भाषेचा एक महत्वांचा विशेष सांगायला हवा तो म्हणजे भाषेत एकच आशय सूचित करण्यासाठी अनेकरचना उपलब्ध असू शकतात. प्राण्यांच्या भाषेत मात्र असे नसते.

### 3. यादृच्छिकता (Arbitrariness) (योगायोगाने जुळलेला) :

अर्थदृष्टया /आशयाचे सूचन करण्याच्या बाबतीतसर्व मानवी भाषा यादृच्छिकतेचे तत्व उपोजितात दिसतात. शब्द (किंवा रुपिम ) आणि या शब्दाने (किंवा रुपिमांचे) सुचित होणारा आशय यांच्यामध्ये कोणताही कार्यकारण संबंध नाही. शब्द आणि त्या शब्दाद्वारे सुचित होणारा आशय पुर्णपणे यादृच्छिक आहे. शब्द व त्याद्वारे सुचविला जाणारा आशय यांचे नाते केवळसंकेताने प्रस्थापित करता येते.

भाषेतील यादृच्छिकतेचे, अनेक फायदे आहेत, यादृच्छिकतेमुळे जुने भाषिक संकेत टाकून देता येतात, गरजेनुसार नवेसंकेत देता येतात, गरजेनुसार नवेसंकेत निर्माण करता येतात. संकेतात सुधारणा किंवा बदलही करता येतात. भाषेत अर्थपरिवर्तनाची प्रक्रिया घडणे शक्य होते. ते या यादृच्छिकतेच्या तत्वामुळे (आणि ध्वनिपरिवर्तन झाले तरी सूचित आशय तोच राहतो तोही यादृच्छिकतेमुळेच) यादृच्छिकतेमुळे माणसाभोवतीच्या सृष्टीतील कोणत्याही नव्या अनुभवाला भाषेच्या माध्यमांमार्फत सामोरा जाऊ शकतो. यादृच्छिकतेमुळे जगातल्या भाषा ऐकमेकींपासून भिन्न राहिल्या आहेत,स्वतंत्र आहेत.

### 4. अदलाबदल ( Interchangeability):

ऐकमेकांच्या भाषिक रचना एकमेकांना समजणे आणि एकमेकांनी ती पुन्हा वापरणे मानवी भाषेत शक्य होते. काही प्राण्यांच्या भाषेत विनिमय पध्दतीने असे आदानप्रदान होऊ शकत नाही उदा. काही प्राणिजातीत नराने सूचित करावयाचा संदेशव मादीने सूचित करावयाचा संदेश वेगवेगळा असतो. उदा. स्टिकलबॅकजातीच्या माशांमध्ये नर-मादी यांचे हेसंदेश नुसतेच भिन्न असतात असे नव्हे, तर प्राण्यांच्या शारिर धर्मामुळे त्यांच्यात अदलाबदल होणे शक्य नसते. मानवी भाषेत मात्र असे नसते. बोलणा-यांच्या भाषिक रचना ऐकणा-याला नुसत्या समजतातच असे नव्हे, तर स्वत:ऐकणारा प्रसंगी त्या रचना वापरु शकतो. मानवी भाषेत बोलणारा व ऐकणारा आदानप्रदान किंवा अदलाबदल करु शकतात मानवी भाषेच्या शिक्षणाचे दोन फायदे झालेले दिसतील.

1) मानवाला अनुकरणाने कोणतीही भाषा शिकणे शक्य होते आणि
2) मानवी भाषेतील नवनिर्मित रचना इतरांच्या सहज पचनी पडतात व त्यांचा सर्वाधिक वापर सुरूहोतो. एक प्रकारे भाषा अधिकाधिक समृध्दचहोत जाते.

### 5. विशिष्टता ( Specialization ) :

प्राण्यांच्या भाषेच्या तुलनेने मानवी भाषेत फार मोठया प्रमाणात विशिष्टता असते.संदेशासूचनाची प्रक्रिया आणि सूचित संदेश या दोहोमध्ये काणत्या स्वरुपाचा संबंध आहे, यावर त्या संदेशावाहक प्रणालीची विशिष्टता अवलंबून असते. हा संबंध एका कृतीतून अपरिहार्यपणे उद्‌भवणारी दुसरी कृती या स्वरुपाच्या असल्यास संदेशवाहक प्रणालीमध्ये कहीही विशिष्टता नाही असे मानता येईल उदा. गृहिणीची पानांची मांडामांड करण्याची कृतीव त्यातून मिळणारा संदेश यात प्रत्यक्ष कार्यकारण संबंधाचे नाते आहे. परंतु, 'जेवण तयार आहे' असेगृहिणीने म्हटल्यावरही कुटुबातील मंडळी (प्रत्यक्ष जेवण तयार आहे की नाही, ताटवाढायची मांडामांड केली आहे की नाही हे प्रत्यक्ष न पाहता ) जेवायला बसायच्या तयारीला लागतात याचाच अर्थ असा की प्रत्यक्ष कृतीऐवजी ती सूचित करणा-या चिन्हव्यवस्थेचा उपयोग करून आपण कार्य साधू शकतो. भाषिक चिन्हव्यवस्थेचा हा एक विशिष्ट गुणधर्म आहे. या विशिष्टतेच्या गुणामुळे माणसाच्या कार्यशक्तीची बचतहोते.

### 7. स्थलकालातीतता ( Displacement) :

या सृष्टीतील प्रत्येक गोष्ट, ते आपल्याला माहिती आहे परंतु ही दोन्ही बंधने ओलांडून त्या आशायाचे सूचन करण्यासाठी शक्ती भाषेपाशी असते एखादा आशय प्रत्यक्ष समार असताना त्या आशयाचे सूचन भाषेद्वारे करता येते. भूतकाळाबद्दल, भविष्यकाळाबद्दल, दूरच्या प्रदेशाबद्दल आपल्याला भाषेद्वारा विनिमय करता येतो.(एखादे फुल आपण प्रत्यक्ष पाहिलेले नसते, ते कुठे उगवतेहेही माहीत नसते, तरी या फुलावरची कविता आपल्याला कशी कळते. याचे उत्तर येथे मिळते.) स्थालकालातीततेच्या या लक्षणामुळेच माणूस आपली अभिव्यक्ती भविष्यासाठी राखून ठेवू शकतो उदा. एखादे चांगले पुस्तक पाहून झालेला आनंद लगेच व्यक्त न करता इष्ट व्यक्ती भेटेपर्यंत आपण थांबू शकतो. प्राण्यांच्या संदेशन पध्दती इतक्या प्रमाणात स्थलकालातीतता नसते.

### 7. सांस्कृतिक संक्रमण ( Cultural Transmission):

भाषेचा वारसा, भाषेची परंपरा एका पिढीकडून दुस-या पिढीकडे सुपुर्त केली जाते मात्र भाषेची परंपरा अशी दुस-या तत्वांकडे देताना तिच्यात काही भर घातलेला असतो मुळ परंपरा आणि आपल्या अगोदरच्या पिढीने तिच्यात घातलेली भर यांसही नवीं पिढी भाषा आत्मसात करते.

ही प्रक्रिया घडत राहण्याचे मुख्य कारण म्हणजे प्राण्यांप्रमाणे माणसाला भाषा जन्मजात येत नसते त्याला ती अनुकरणाने, प्रयत्नपूर्वक शिकावी लागते एक व्यक्ती दुस-या व्यक्तीकडून किंवा एक पिढी दुस-या पिढीकडून भाषा शिकत असते तेव्हा अनुभवच शिकत असते. मानवाचा शब्दसंग्रहवाढत असतो म्हणजे त्याचे भौतिक आणि तात्विक जगाबद्दलचे ज्ञानच वाढत असते, पण हे ज्ञान मिळवण्यासाठी माणसाला अगदी प्रारंभापासून सुरुवात करावी लागत नाही. त्याच्या अगोदरच्या पिढीने काही ज्ञानसंचय करुन ठेवलेलाच असतो. माणूस हा ज्ञानसंचय भाषेच्या माध्यमातून मिळवतो आणि त्यात भर घालीत असतो ही सांस्कृतीक वाढ भाषेमुळेच शक्य होते. संस्कृतीच संवर्धन करणे आणि एका पिढीकडून दुस-या पिढीकडे संक्रमीत करणेया भाषेच्या खास क्षमता आहेत या क्षमता प्राण्यांच्या भाषेत नसतात.

भाषेची ही सात लक्षणे जगातल्या सर्व भाषांत आढळतात. मनुष्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही सजीवांच्या संदेशानप्रणालीत ही लक्षणे आढळणार नाहीत. सजीवांच्या जगात माणसाला जे पद प्राप्त झालेले आहे किंवा माणूस माणूसपण प्राप्त झले तेच मुळात तो भाषेचा वापर करु लागल्यावर.

### भाषाभ्यासाची मुख्य अंगे :-

भाषा म्हणजे काय ? तिचे मानवी जीवनातील कार्य कोणते ? याचा विचार केल्यानंतर भाषेची अंगे कोणकोणती आहेत ? याचा विचार करणे आवश्यक आहे. आपण वाक्य रुपाने अर्थपुर्ण बाललो तरच संज्ञापनाचे कार्य घडू शकते. वाक्यातील सर्व शब्दांमध्ये परस्परसंबंध असावा लागतो. प्रत्येक शब्द अनेक ध्वनींच्या संयोगाने बनलेला असतो. (यामध्ये सुत्राला महत्व ) कोणतेही ध्वनी एकत्र जोडले म्हणजे शब्द होत नाहीत. तसेच कोणताही शब्द एका मागोमाग उच्चारले म्हणजे म्हणजे वाक्य होत नाही. या सर्वामध्ये वेळ असणे आवश्यक असते कारण भाषा ही समग्रपणे प्रकट होत असते पण अभ्यासाच्या सोईसाठी भाषेचे घटक वेगवेगळे करता येतात, त्या प्रत्येक घटकाचा तपशीलवार विचार करता येतो असे केल्याने भाषेचे समर्ग कार्य समजण्यास मदत होते.

### भाषाभ्यासाची प्रमुख अंगे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

अ) ध्वनिविचार - यामध्ये स्वनविज्ञान आणि स्वनिमविन्यास यांचा समावेश होतो.

आ) व्याकरण - यामध्ये शब्दविचारकिंवा रुपविन्यास आणि वाक्यविन्यास यांचा समावेश होतो.

इ) अर्थविचार - यामध्ये शब्दाचा अर्थ आणि वाक्याचा अर्थ यांचा समावेश होतो.

ई) शब्दसंग्रह- सामान्यत: भाषेत वापरले जाणारे शब्द शब्दांची घटना, शब्दांचे प्रकार आणि शब्दांचे आदान-प्रदान यांचा समावेश असतो.

कोणत्याही भाषेच्या वर्णनात्मक पध्दतीने करावयाच्या अभ्यासाची ही मख्य अंगे असतात. याखेरीज भाषेच्या व्यापक अभ्यासात अनेक अंगांचा समावेश होऊ शकतो. उदा. लेखनविचार, कोशविचार, लिपीविचार इ. पण अशा अंगांना भाषेच्या अभ्यासाचे मुख्य घटक मानण्यापेक्षा ही भाषाभ्यासाची स्वतंत्रक्षेत्रे आहेत. असे मानणेच योग्य ठरेल.

### भाषेच्या प्रमुख अंगांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### अ) ध्वनिविचार :

काणतीही मानवी भाषा मुखाद्वारे उच्चारल्या जाणा-या ध्वनींनी बनलेली असते. ध्वनींचे उच्चारण आणि ध्वनींचेश्रवण हा भाषाव्यवहाराचा मुख्य आधार होय. मानवाला आपल्या मुखाद्वारे असंख्य प्रकारचे ध्वनी उच्चारता येतात. पण लिहून दाखवता येत नाही. उदा. लहान मुलांना खेळवण्यासाठी मोठया माणसाने काढलेले चित्र-विचित्र आवाज, खेळण्याच्या भरात मुलाच्या तोंडून आपोआप प्रकट होणारे त-हेत-हेचे आवाज, जनावरे हा कताना गुराख्याकडून किंवा धनगराकडून बाहेर पडणारे विशिष्ट प्रकारचे आवाज. यांसारखे अनेक आवाज माणसे उच्चारता तव ऐकतात. याशिवाय माणसांच्या इतर कृतीही ध्वनीयुक्त अशा असतात. उदा.

खोकला,उचकी, शिंक, जांभई, हसणे, रडणे,ढेकर इ. असे शेकडो प्रकारचे आवाज आपण काढू शकत असलो तरी असे आवाज म्हणजे भाषा नाही. याचाच अर्थ भाषेत वापरले जाणारे ध्वनी हे मोजकेच असतात. या ध्वनींचा दोन पातळयांवर अभ्यास करता येतो.

**1) स्वनविज्ञान -** जगातील भिन्न - भिन्न देशातील समाजातील माणसे कोणकोणते उच्चारण कशाप्रकारे करतात ? असे उच्चारण करताना हालचाली कशा होतात ? प्रत्येक ध्वनीच्या उच्चारणाचे स्थान कोणते ? अशा उच्चारणांसाठी करावा लागणारा प्रयत्न कोणता ? आणि अशासर्व ध्वनींचे वर्गीकरण कसे केले जाते ? या सर्व गोष्टींचा विचार स्वनविज्ञानात होतो.

**2) स्वनिमविन्यास -** स्वनिमविन्यास म्हणजे विशिष्ट भाषेत योजल्या जाणा-या भाषा पध्दतींचा अभ्यास सर्वसाधारणपणे मनुष्यप्राणी त-हेत-हेचे ध्वनी निर्माण करीत असला तरी प्रत्येक भाषक समाज-स्वत:चे वेगळेपण असतो. आणि प्रकट करीत असतो.' चमचा', ' जगणे' या शब्दामधील 'च' आणि 'ज' हे मराठी भाषकांच्या उच्चारणाचे खास वैश्ष्ट्यिे आहे चमत्कार, जीवन असे या च आणि ज चे तात्लव्य उच्चारणही माणूस करीत असतो मात्र इतर बहुसंख्य भाषकांना उच्चारातील हा फरक दाखविणे जमत नाही. मराठीप्रमाणे प्रत्येक भाषक समाजाची अशीउच्चारण वैशिष्ट्ये असतात. बंगाली माणूस ओ आणि औ यांचे संमिश्रण असलेला जो उच्चार करतो तो आपल्याला जमत नाही. तेव्हा प्रत्येक भाषक समाजाचे जे उच्चारण वैशिष्ट्ये असते. त्याचा विचार स्वनिमविन्यासात केला जातो. अर्थात स्वनविज्ञानाच्या अभ्यासाचे पाठबळ असेल तरच स्वनिमविन्यास जाणणे सुलभ होईल.

**आ) व्याकरण :** व्याकरण या संज्ञेचा शब्दश: अर्थविशेषत्वाने स्पष्ट करणे. असा आहे. अर्थात भाषेचे किंवा बोलण्याचे रुप आणि त्यासंबंधीची नियमव्यवस्था यांचे स्पष्टीकरण व्याकरण करीत असते. केवळ एका मागोमाग ध्वनीशब्द तयार करुन चालत नाही. तर आपल्याला एका मागोमाग अनेकशब्द उच्चारायचे असतात. अशा शब्दांमध्ये विशिष्ट संगती म्हणुन आणिहेतू असावा लागतो. असे नसेल तर बोलणे न होता बडबडणे ठरेल. बोलणेहे अर्थपूर्ण आणि बडबडणे हे निरर्थक अशी आपली धारणा असते. अनेकदा शब्दाच्या मुळ रुपात वेगवेगळया प्रकारे बदल करुन म्हणजेच विकरण त्याचाच अभ्यास व्याकरण घटकात केला जातो. लिंग, वचन, विभक्ती या कारणांसाठी शब्दांची मुळ रूपे अनेकदा बदलली जातात. व्याकरणाचे शब्दविचार आणि वाक्यविचार ही अंगे महत्वाची आहेत.

1. दोनकिंवा अधिक शब्द विशिष्ट पध्दतीने एकत्र केले किंवा जोडले जातात आणि एकाशब्दापासून दुसरे अनेक शब्द बनविले जातात.
2. मनातील एकविशिष्ट आशय एका किंवा अनेकशब्दांच्याद्वारे संपूर्णपणे प्रकट केला जातो, त्या रचनेला वाक्य असे म्हटले जाते.

   या वाक्याचे काही किमान घटक असावे लागतात

थोडक्यात ध्वनिविचाराचा पाया तयार असेल तरच त्यावर व्याकरणाची इमारत उभी करता येते. कोणत्याही भाषेच्या अभ्यासात व्याकरण हाच विभाग केंद्रवर्ती झालेला दिसून येतो.

**इ) अर्थविन्यास :** भाषा ही जितकी शारीरिक तितकीच ती बौध्दिक आणि मानसिक क्रिया असते. विचार करुन बोलणे आणि चुकल्यानंतर समजून घेणे अशीसाखळी पूर्ण झाल्याशिवाय संज्ञापन हे भाषेचे कार्य होऊ शकणार नाही. याचाच अर्थ भाषिक क्रिया ही एकाचवेळी इंद्रिय गोचर म्हणजे शरीराला जाणवणारी आणि मनोज्ञ म्हणजे मनाने जाणता येणारी अशा दोन पातळयांवर घडत असते. यातील शरीरसंवेदनांच्या आवाक्यातील जी बाब आहे तिचे विश्लेषण, पृथक्करण करणे शक्य असते. पण अव्यक्त अशी जी बाब तिच्याबद्दल निश्चितविधान करणे तसे सोपे नसते. कारण माणसाचे मन ही एक अतिशय गूढ,तरल,गुंतागुंतीची आणि अव्हान देणारीगोष्ट आहे. कोणतीही बोलण्याची क्रिया घडताना माणसाच्या मेंदूमध्ये असलेल्या ध्वनिकेंद्राद्वारे वाक्यद्रियांना संदेश प्राप्त होतो. त्याला अनुसरुन वाक्यइंद्रियांची हालचाल होत असते. ही प्रक्रिया अतिशय अल्पकाळात सततघडत असते यातील वाक्यइंद्रिये सदोष असतील तर बोलण्याची शारिरीक कृती व्यवस्थित होणार नाही. आवाज नीट न उमटणे,ध्वनीचा नेमका उच्चार न होणे बोबडेपणा, तोतरेपणा यासारखे दोष निर्माण होतील. पण मेंदूतील केंद्रातच बिघाड झाला असेल तर माणसाचे बोलणे अविचारीपणाचे, निरर्थक आणि चमत्कारिक होऊ शकेल. वेड म्हणजे मानसिकदृष्ट्या रुग्ण असेल तर त्याचे बोलणे चमत्कारिकवाटते. याचे कारणहेच होय आपणांस कोणता आशय व्यक्त करायचा आहे,हे मेंदूकडून आधीठरविले जाते. त्या आशयाच्या संदर्भात कोणता ध्वनिसंकेत आहे ते विचारात घेतले जाते आणि मगच बोलण्याची कृती होते. बोलण्याच्या कृतीनंतर शारिरीकदृष्ट्या श्रवणाचे कार्य प्रथम घडते आणि त्यानंतर लगेच मेंदूतील श्रवणकेंद्रास मज्जातंतूच्याद्वारा संदेश पोहोचविले जातात. असेसंदेश पोहोचताच त्यांचा अर्थ लावण्याचे काम लगेच घडते. यालाच आपण बोललेले - म्हणजेच एकलेले समजते असे म्हणतो. मेंदूतील या श्रवण केंद्राचे काम नीट न झाल्यास त्या व्यक्तीला ऐकू येते, पण समजत नाही. या सर्व क्रिया एकामागोमाग एक अशी

सुसंगतपणे व अखंडपणे होत असतात. बोलण्यापूर्वी दक्षतेने विचार करणे आणि ऐकत असताना सावधानतेने लक्ष पुरविणे हे भाषा व्यवहारात अत्यावश्यक असते. मेंदूतील श्रवणकेंद्राचे असेही एक वैशिष्ट्ये दिसते की, ऐकण्याची क्रिया घडत असतातना इतर इतर अनेक आवाज टाळून आपणांस पाहिजे तिकडे लक्ष पुरविता येते. एकवैशिष्ट्ये दिसते की, एकंदरीत अर्थप्रक्रिया गुंतागुंतीची असून ती योग्यप्रकारे होण्यावरच संवाद होऊ शकतो.

**ई) शब्दसंग्रह :** भाषा ही ध्वनींनी बनलेली असली तरीसुध्दा ध्वनी म्हणजे बोलणे नव्हे, ध्वनीच्या संयोगाने संकेतावर आधारित असेशब्द आपण बनवतो भाषाव्यवहारात शब्द या घटकालाच महत्वाचे कार्य बजावयाचे असते शब्द हा सावकाश, घाईने, जोर देऊन, उच्चारता येतो यादृष्टीने तो पूर्णपणे ध्वनीवर अवलंबून असतो. असे असले तरी वेगवेगळया शब्दांचे संयोग, विभाजन करता येते, शब्दाला प्रत्यय लावता येतो आणि एकाशब्दापासून दुसराशब्द बनविता येतो शब्दांच्या वेगळेच महत्व असते. मी पुस्तक वाचतो आहे. हा मराठी भाषकांनी वापरलेला शब्दकोश आहे.

' वाचतो आहे मी पुस्तक'

' पुस्तक वाचतो आहे मी' यांसारखे बदललेले शब्दरुप होऊ शकतात. मात्र 'वाचत पुस्तक आहे' असेचालणार नाही. प्रत्येक व्यक्ती बोलताना शेकडो शब्द वापरत असल्याने, त्या अर्थाने प्रत्येक व्यक्तीचा एक स्वतंत्र शब्दसंग्रह असतोवाढते वय, शिक्षण, विविध व्यवसाय आणि जीवनातील लहान-मोठे अनुभव यांच्यामुळे प्रत्येक व्यक्तीचा शब्दसंग्रह वाढत असतो तसा तो कमीही होऊ शकतो. दुस-या प्रांतात राहणेकिंवा दुस-या भाषकांशी स्वभाषेपेक्षा वेगळया भाषेतून व्यवहार करण यांसारख्या कारणांमुळे विशिष्ट आशय व्यक्त करण्यासाठी, आपल्या भाषेत कोणतासंकेत आहे याची सवय सुटल्यामुळे विस्मरण होते आणि आपला शब्दसंग्रह कमी होतो विशिष्ट भाषा बोलणा-या हजारो किंवा लाखो व्यक्ति मिळून तो भाषक समाज निर्माण होत असतो अशा भाषक समाजाच्या अनेक पिढया होऊन गेलेल्या असतात. भूतकाळातील व्यक्ती आणि विदयमान व्यक्ती अशा सर्वांच्या वापरातून प्रत्येक भाषेचा शब्दसंग्रह घडत असतो. तो भाषक समाज सांस्कृतिकदृष्ट्या किती प्रगत आहे, त्याच्या गरजा कोणकोणत्या आहत, त्याच्या उद्योग व्यवसायाची क्षेत्रेकिती समृध्द आहेत यावरच त्या भाषेचा शब्दसंग्रह लहान/मोठा ठरता असतो असाशब्दसंग्रह हा स्थिर नसून तो वेगवेगळ्या कारणांमूळे तो परिवर्तनशील असतो. गेल्या शतकभरात आपल्या पोशाखात खूप बदल झाल्यामुळे (कोट, पँट, शर्ट) पोषाखा विषयक शेकडो नवीनशब्द आपण वापरु लागलो.

'शब्दसंग्रह'या भाषाभ्यासाच्या क्षेत्रात शब्दासंबंधीच्या घडामोडीच्या विचार तर केला जातोच त्याच बरोबर शब्दांचे विविधप्रकारे वर्गीकरण, विश्लेषण केले जाते. यातूनच शब्दांच्या जाती, विकारीशब्द, समानार्थी शब्द सिध्द शब्द, स्थापित शब्द स्वकीय शब्द, परकीय शब्द, समानार्थी शब्द, विरूध्दार्थीशब्द असे अनेक प्रकारचे वर्गीकरण करता येते अशाप्रकारे शब्दनिर्मितीचा शब्दातील परिवर्तनाचा आणि बोलण्यातील शब्द योजनेचा विविध प्रकारे अभ्यास करता येतो.लहानमुलांना परभाषेची ओळख शब्दामुळेच होऊ लागते आणि मोठया व्यक्तिंनाही परभाषा शिकताना प्रामुख्याने शब्दांना आणि शब्दयोजनेला सामोरे जावे लागते. त्यामुळेच 'शब्दसंग्रह'या भाषेच्या अंगालाही महत्व प्राप्त होते.

**भाषेच्या अभ्यासाचे महत्वः**

भाषाही आपल्या दैनंदिन जीवनाशी इतकी संबध्द आहे की ती आपल्याला श्वासोच्छावासाप्रमाणे नैसर्गिक वाटू लागते. भाषा म्हणजे अत्यंत मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा अतिशय विकसित असा मानवी निवेदन प्रकार आहे. त्याकरिता भाषेचा अभ्यास जवळजवळ अपरिहारी ठरतो, हा अभ्यास जसा भाषेचा असू शकेल तसा अन्य शाखेत माध्यम म्हणून केलेला असेल. भाषाभ्यासाच्या या दुहेरी महत्वामुळे तो अटळ ठरतो/एवढे मात्र खरे भाषेशिवाय मानवी ज्ञानसंवर्धन आणि संक्रमण अशक्य झाले असते आणि साहित्यासारख्या कक्षा अस्तित्वात आल्या नसत्या, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र या शाखांचाव अन्य शास्त्राभ्यासास भाषाभ्यास कितीतरी सहाय्यक ठरण्यासारखा आहेहा भाग सोडला तरीमानवी वर्तनाच्या एका महत्वपूर्ण अंगाच्या अभ्यासाला एकस्वतंत्र ज्ञानमूल्य आहे.भाषा हाच भाषाशास्त्राचा अभ्यासविषय आहे हे इतर शास्त्रांप्रमाणे भाषाशास्त्राचेही माध्यम आहे. पण हे त्याचे साध्य ही आहे. साध्य आणिसाधन येथे एकरुप झाले आहे.

'भाषाशास्त्र म्हणजे भाषेचा शास्त्रीय अभ्यास' अशी सुटसुटीत व्याख्या करतायेईल यातील 'भाषा'हा शब्द सर्वसाधारण व विशिष्ट अशा दोन्ही अर्थांनी अभिप्रेत आहे व्यक्तिनिरपेक्षीत वस्तुनिष्ठ अभ्यासपध्दती 'शास्त्र' या शब्दात अंतर्गत असते. भाषाशास्त्रातील अर्थविज्ञानासारखी अंगेसामाजिक शास्त्रांशी जवळीकसाधतात. जर ध्वनिविचारांसारखी अंगे भौतिक शास्त्रांकडे झुकतात. भाषाशास्त्रामध्ये शास्त्रकल्पनेचे दोन्ही विशेष आढळतात, त्याला शास्त्र असे म्हटले जाते.

भाषाशास्त्र नवे असले तरी भाषेचा अभ्यास नवा नाही. मानवी इतिहासात भाषेच्या महत्वाचे भान जाणता-अजाणता लोकांना असल्याचे पुरावे आपल्याला उपलब्ध होऊ शकतात. भाषोत्पत्तीला दैवी मानण्याचे सूत्रसर्व आदिसंस्कृतीस भाषाविधायक विचारांना जोडणारे आहे. यात इतिहासाचा आरंभकालापासून विचारवंतांनी भाषेत. एक चिकित्सक रस घेतलेला दिसतो. निरुवत आणि व्याकरण यांचा विकास धर्मसंबंध्दरुपात वेदकाळापासून होत आलल्या भारतीय परंपरेत दिसतो. भाषाविषयक मूलभूत प्रश्नांची चर्चाग्रीकव रोमन संस्कृतीत प्लेटोपासून (इ.स.पू. 4 थे शतक) सुरू होते. ऑरिस्टॉटल, सिसेरो यांनी चालू ठेवलेली दिसते. 9व्या-10व्या शतकात अनेक विद्वानलेखकांनी भाषेचा विचार केला आहे. भाषाभ्यासाविषयांचा हा उत्साह युरोपातील प्रबोधनयुगातही दिसतो प्राचीन काळात भाषाशास्त्राला स्वयंपूर्णता नव्हती. तर्कशास्त्र, वृत्तविचार, तत्वज्ञान, इतिहास, साहित्य समीक्षा अशा शास्त्रांच्या कमी-अधिक गरजानुसार त्याचा अभ्यास होत असे.

भाषेचा आपण साधन म्हणून विचार करतो भाषाशास्त्र मात्र भाषेकडे साध्य म्हणून पाहते. भाषेतील वाड्मय वतिची जडणघडण यांचे जाणिवपूर्वक विभाजण करुन भाषेचा भाषा म्हणून विचार करण्याचे काम भाषाशास्त्र करते. भाषा स्वतंत्रव स्वायत्त मानून तिचा पृथक्करणात्मक अभ्यास त्यात केला जातो. मानवी समाजात भाषा कोणते काम करतेव ते करणारी तिची घडण कशी आहे, दोन्हींचा येथे शोध घ्यावयाचा असतो. भाषेचा कार्यात्मक (Functional) व रूपनिष्ठ (Formal) असा विविधविचार भाषाशास्त्रात अभिप्रेत आहे. ध्वनी, वर्ण, रुप, वाक्य, वस्तुसथिती, शब्दसंग्रह, अर्थ या भाषिक अंगांचाव त्यांनी सिध्द झालेल्या भाषिक संस्थेचा अभ्यास करुन कोणत्याही विशिष्ट भाषेचे सर्वांगीण व अचूक वर्णन त्यात करण्यात येते. विशिष्ट भाषेच्या अभ्यासाच्या सहाय्याने सर्वसाधारण भाषेचे स्वरुप व कार्यपध्दती याविषयीचे सिध्दांत भाषाशास्त्र करते. आपल्या निरनिराळया अंगाचा विविध पध्दतीने अभ्यास करण्याचा अनेक शाखा भाषाशास्त्रा अंतर्गत येतात.

**संदर्भ :**

1) वर्णनात्मक भाषाविज्ञान - डॉ.लीलागोविलकर
2) भाषाविज्ञान : ऐतिहासिक आणि वर्णनात्मक- डॉ.अंजली सोमण,डॉ.मालशे, डॉ.इनामदार
3) भाषाविज्ञान परिचय :डॉ.द.दि.पुंडे
4) आधुनिक भाषाविज्ञान : डॉ.कल्याण काळे
5) अभिनव मराठी शब्दकोश- भाग 4 था , संपा.द.ह.अग्निहोत्री, व्हिनस प्रकाशन, पुणे